# मुंबई विद्यापीठ

विद्याविषयक नियोजन
आणि विकास विभाग
क्र.वि.नि.वि.वि/२०१९–२०/२१
११ ऑक्टोंबर, २०१९

परिपत्रक : —

विषय : — विद्यापीठातर्फे आदर्श प्राचार्य पुरस्कार सन २०१८–१९ शिफारस करणेबाबत.

आपणांस विदित आहे की, महाविद्यालयीन स्तरावर आदर्श शिक्षकांचा शोध घेऊन विद्यापीठातर्फे विद्यापीठाने निर्धारित केलेल्या निकषाच्या आधारावर **महाविद्यालयातील २ शिक्षक (यापैकी १ शहरी व १ ग्रामीण महाविद्यालयातील शिक्षक)** अशा आदर्श शिक्षकांना शिक्षक पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. त्याचप्रमाणे सन २०१९–२० पासून महाविद्यालयीन स्तरावर आदर्श प्राचार्यांचा शोध घेऊन विद्यापीठातर्फे विद्यापीठाने निर्धारित केलेल्या निकषाच्या आधारावर **महाविद्यालयातील २ प्राचार्य (यापैकी १ शहरी व १ ग्रामीण महाविद्यालयातील प्राचार्य)** विद्यापीठातर्फे निवड होणा–या पुरस्कार प्राप्त आदर्श प्राचार्यांना प्रत्येकी **रू. ११,०००/– (रूपये अकरा हजार फक्त)** रोख व त्यासोबत प्रमाणपत्र व स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात येईल.

या परिपत्रकाद्वारे असे कळविण्यात येत आहे की, महाविद्यालयातील विविध शाखांअर्तगत कार्यरत असलेले प्राचार्य यांना किमान ५ वर्षे सेवा झालेल्या चारित्र्यसंपन्न, विशेष प्राविण्यासह अर्हता व अनुभव असलेल्या प्राचार्यांनी सोबत जोडलेल्या विवरण पत्राच्या इंग्रजी प्रतीमध्ये भरून **सहायक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग, कक्ष क्र. १३२, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई — ४०० ०३२** यांचेकडे टपाल विभागामार्फत दिनांक **५ नोव्हेंबर, २०१९** पर्यत प्रस्ताव **प्रत्येकी चार प्रतीत** पाठवून **देण्याची व्यवस्था करावी.** (संबधित प्राचार्यांची १० ते १५ ओळीत संक्षिप्त माहिती/दूरध्वनी क्रमांक/महाविद्यालयाचा दूरध्वनी क्र. व घरचा पूर्ण पत्ता, तसेच संबधित प्राचार्यांचे विद्यापीठ मान्यता पत्राची प्रत (**Teachers /Principal approval**) सोबत जोडणे आवश्यक आहे. (**दिनांक ५ नोव्हेंबर, २०१९** नंतरचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत तसेच अपु–या माहितीसह पाठविलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद असावी.)

**तसेच महाविद्यालयीन प्राचार्य यांचा प्रस्ताव संस्थाचालक यांचे मार्फत शिफारशीसह पाठविणे क्रमप्राप्त आहे.**

मुंबई — ४०० ०३२
११ ऑक्टोंबर, २०१९

(डॉ. अजय देशमुख)
कुलसचिव

प्रती,

१) प्राचार्य, सर्व संलग्नित अनुदानीत व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व वास्तुशास्त्र महाविद्यालयें.

(अ) **प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाही अग्रेषित :—**

१. स्वीय सहायक (१) मा. कुलगुरू (२) प्र. कुलगुरू (३) कुलसचिव

# मुंबई विद्यापीठ

## वर्ष २०१८–१९ या वर्षाकरिता आदर्श प्राचार्य पुरस्काराकरिता शिफारस/अर्ज

प्राचार्यांचे नाव :

_______________________________________________

महाविद्यालयाचे नाव : ______________________ प्रथम नियुक्ती दिनांक

__________

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य म्हणून सलग ५ वर्षे सेवा झालेली आहे काय? | |
| २. | शोधपत्रिकेत (ISSN) प्रकाशित झालेल्या शोधनिबंधांची संख्या. (वैयक्तिक) | |
| ३. | प्रकाशित साहित्य/पुस्तके (ISBN) ची संख्या. (वैयक्तिक) | |
| ४. | राज्य व राष्ट्रीयस्तरावरील वाचण्यात आलेल्या शोधनिबंधांची संख्या व उपस्थिती (वैयक्तिक) | |
| ५. | विद्यापीठाच्या उपक्रमात, कार्यक्रमात, प्रकरणात प्रत्यक्षात घेतलेला सहभाग | |
| ६. | महाविद्यालयास प्राचार्यांच्या कालावधीत कायम संलग्निकरण प्राप्त झाले किंवा कसे? नसल्यास, त्यासाठी कोणते प्रयत्न करण्यात आले? | |
| ७. | महाविद्यालयाचे नॅक/एनबीए संस्थेकडून | |

| | | |
|---|---|---|
| | मूल्यांकन/पुनर्मुल्यांकन करण्यात आले आहे किंवा कसे? सद्यस्थितीचा दर्जा/स्कोअर काय आहे? | |
| ८. | महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या परिक्षांचे निकाल/गुणवत्तेबाबत मागील पाच वर्षाचा आलेख | |
| ९. | महाविद्यालयामध्ये प्राचार्याच्या कालावधीत किती नवीन अभ्यासक्रम सुरू केले? | |
| १०. | महाविद्यालयातील किती अध्यापकांना/विद्यार्थ्यांना पीएच.डी. साठी प्रोत्साहित करण्यात आले? तद्वतच महाविद्यालयामार्फत संशोधनाचे मोठे (मेजर) व लघु (मायनर) स्वरूपाचे किती प्रकल्प सादर करण्यात आले आहेत? तसेच मान्य झालेल्या प्रकल्पांची संख्या | |
| ११. | महाविद्यालयामध्ये कोणत्या पायाभूत सुविधा निर्माण केल्या आहेत (भौतिक व शैक्षणिक)? तसेच महाविद्यालय परिसर, कार्यालय, वर्ग, ग्रंथालय, प्रयोगशाळा, प्रसाधनगृहे स्वच्छते संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात येते? | |
| १२. | महाविद्यालयामार्फत राज्य/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्तरावरील किती शैक्षणिक कार्यशाळा व चर्चासत्र आयोजित करण्यात आले? | |
| १३. | महाविद्यालयास विविध उपक्रमाबद्दल मिळालेली पारितोषिके | |

| | | |
|---|---|---|
| १४. | महाविद्यालयासाठी विद्यापीठ अनुदान आयोग (यु.जी.सी. किंवा इतर संस्थांकडून प्राप्त झालेले अनुदान) | |
| १५. | महाविद्यालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी अभ्यासक्रमाव्यतिरिक्त किती इतर उपक्रमराबविण्यात आले? | |
| १६. | महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे विविध खेळातील जिल्हा, राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्राविण्य मिळविण्याची किती टक्केवारी आहे. तसेच विद्यार्थ्यांचे एन.सी.सी./एन.एस.एस. मधील योगदान कसे आहे, सांस्कृतिक कार्यक्रम कशाप्रकारे राबवितात? | |
| १७. | आंतरराष्ट्रीय स्तरावरील ख्यातीच्या जर्नल (इंटरनॅशनल पीअर जर्नल) मधून महाविद्यालयातील संशोधकांनी किती शोधनिबंध प्रकाशित केले? | |
| १८. | महाविद्यालयामार्फत मागास, अल्पसंख्यांक व गरजू विद्यार्थ्यांसाठी कोणत्या विशेष योजना राबविण्यात येतात? | |
| १९. | महाविद्यालयामार्फत विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या तक्रारी निवारण्याबाबत कशाप्रकारे कार्यवाही केली जाते? महिला तक्रार निवारण कक्ष | |
| २०. | महाविद्यालयाचे स्वतंत्र संकेतस्थळ निर्माण केले आहे किंवा कसे. सदर संकेतस्थळ अद्ययावत ठेवण्यात येते काय? | |
| २१. | महाविद्यालयामध्ये संगणक प्रणालीचा पूर्णपणे वापर करण्यात येतो किंवा कसे? | |

| | | |
|---|---|---|
| | | |
| २२. | महाविद्यालयाकडून चालविण्यात येणा—या एकूण अभ्यासक्रमापैकी किती अभ्यासक्रम व्यवसायाभिमुख आहेत. | |
| २३. | इतर | |

(महिती आवेदकाने स्वत: भरून संस्थेच्या सचिव/अध्यक्षांमार्फत सादर करावी.)

## **संस्थेचे अध्यक्ष/सचिवांचे अभिप्राय**

(टिप : प्राचार्य सलग ५ वर्षे सेवेबाबतचा अभिप्राय)

स्थळ : 
दिनांक :

अध्यक्ष/सचिवांची
स्वाक्षरी व शिक्का

संस्थेचे नाव :–

## **कार्यालयीन उपयोगाकरिता**
## **अहवालातील निरिक्षण**